# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३८९/२०२३ दिनांक – ०४/११/२०२३

## जबरी चोरी व दुचाकी वाहने चोरी करणाऱ्या आरोपीतांना गजाआड करण्यात विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- ३१/१०/२०२३ रोजी पहाटे ०६:२०वा.चे सुमारास म्हाडा कॉलनी, विरार(प.), येथील जकात नाका ते नालासोपारा रोडवरील यशवंत सर्कल जवळून तक्रारदार महिला हया नालासोपारा बाजुकडे पायी चालत जात असतांना, अचानक त्यांचे पाठीमागुन दोन अनोळखी इसम त्यांचे ताब्यातील मोटर सायकलवर येवुन, तक्रारदार यांचे हातातील एम.आय.कंपनीचा रेडमी नोट-५ प्रो मॉडेलचा मोबाईल फोन जबरीने हिसकावुन घेवुन, चोरी करुन चोरुन नेले बाबत तक्रारदार- **सौ.पल्लवी दिपक गायकवाड, वय-३० वर्षे,** व्यवसाय- नोकरी, रा.राजोडी बिच, विरार(प.), ता.वसई, जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर विरार पो.स्टे. गु.रजि.नं. १०३०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे दि.३१/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने विरार गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, घटना ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेजचे परिक्षण करुन, तांत्रिक व गुप्त बातमीदार यांचे मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे. १)**अजित कनोजिया, वय-२३ वर्षे,** २)**अशरफ शेख, वय-२४ वर्षे,** दोन्ही रा.अलकापुरी रोड, नालासोपारा(पु.), ता.वसई हे मिळुन आले. नमुद आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता,त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निषन्न झाल्योन त्यांना दि.३१/१०/२०२३ रोजी नमुद गुन्हयात अटक केली आहे. सदरचा गुन्हयातील अनोळखी आरोपीतांचा शोध घेवुन, निष्पन्न करुन, त्यांस अवघ्या १२ तासांचे आत अटक करुन गुन्हयाची उकल केली आहे. नमुद आरोपीतांकडे अधिक तपास केला असता, त्यांचेकडून वेगवेगळया कंपन्यांचे **एकुण-०६ मोबाईल फोन** व **०३ मोटर सायकल** असा **एकुण-१,६१,५००/- रुपये किंमतीचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गु.रजि.नं. व कायदा कलम |
|---|---|---|
| १ | विरार | १०३०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | विरार | १०२९/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ३ | विरार | १०३१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम-३९२, ३४ प्रमाणे |
| ४ | विरार | १०३२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ५ | विरार | १००१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ६ | अर्नाळा सागरी | ३५४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ७ | तुळींज | ७८१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३९२, ३४ प्रमाणे |
| ८ | तुळींज | ४४३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |
| ९ | नवघर | ६६४/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सा़ो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सा़ो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सा़ो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.ज्ञानेश फडतरे, पो.हवा.सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं.संदिप शेळके, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

-----ooo-----